# राळेगणसिद्धीला गेल्यावर प्रथम ब्लॉग बंद करणार - अण्णा

नवी दिल्ली - कोअर कमिटीत बदल करण्याचे माझ्या मनात होते, पण तो माझा निर्णय नव्हता. असे स्पष्टीकरण देत अण्णांनी ब्लॉग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. लेखक व पत्रकार राजू परुळेकर यांनी शनिवारी सकाळी अण्णांचे पत्र ब्लॉगवर टाकल्यानंतर टीम अण्णा अडचणीत आली होती.

जनजागृतीसाठी अण्णांनी सोशल नेटवर्किंग साइटवरील ब्लॉगचा वापर केला होता, मात्र हेच ब्लॉग आता टीम अण्णामधील मतभेद चव्हाट्यावर आणत आहेत. त्यावर तीव्र प्रतिक्रिया देताना अण्णा म्हणाले की, 'आमच्या टीममधील किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांच्यावर कथित आरोप होत असल्याने माझ्या मनात अनेक विचार येत होते, पण काही दिवसांनी माझ्या लक्षात आले की हे सारे आमची टीम फोडण्यासाठी केले जात आहे. म्हणून टीममध्ये बदल करण्यात आला नाही. माझ्या मनात येणारे विचार मी कधी कधी लिहून ठेवतो, पण त्यात लिहिलेले विचार हा माझा निर्णय असेलच असे नाही. जर त्यावर माझी सही असेल तरच तो माझा निर्णय आहे असे समजावे, असेही अण्णांनी स्पष्ट केले. परुळेकर यांनी ब्लॉगवर प्रसिद्ध केलेल्या पत्रावर सही नसेल तर तो माझा निर्णय मानता येणार नाही, पण सही असेल तर नंतर स्पष्टीकरण देईन, असेही ते म्हणाले. त्या पत्रातील अक्षर अण्णा तुमचेच आहे असे वाटते, असा एका पत्रकाराने प्रश्न केल्यावर अण्णा चिडले. हा आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे आणि त्यामुळे राळेगणसिद्धीला गेल्यावर मी प्रथम ब्लॉग बंदच करून टाकतो, अशी थेट घोषणा अण्णांनी केली. पुढल्या एकाही प्रश्नाचे उत्तर न देता अण्णा तडक निघून गेले.